तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
ध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet :http/www.dte.org.in

परिपत्रक

क्रमांक : 10/एडीएम/पदविका/थेद्वि/2015/ 202
दिनांक : 21 JUL 2015

विषय : शैक्षणिक वर्ष 2015-16 मधील थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील अल्पसंख्याक कोटयामधील रिक्त राहिलेल्या जागा भरणेबाबत...

शैक्षणिक वर्ष 2015-16 करिता थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियासाठी या संचालनालयामार्फत गुणवत्ता यादी तयार करुन प्रसिध्द केली जाते. केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेमध्ये या गुणवत्ता यादीमधील विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र असतात. संस्था केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेमध्ये त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या रिक्त जागा व मंजुर प्रवेशक्षमतेच्या 20 टक्के जागा अशा प्रकारे प्रत्येक अभ्यासक्रमातील एकुण जागासाठी जाहिरात देऊन पात्र विद्यार्थ्यांकडुन अर्ज मागवुन संस्थास्तरावर विद्यार्थ्यांना प्रवेश देतात.

तसेच शासन प्रवेश नियमावलीनुसार अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्था हया खालील नमुद तक्त्याप्रमाणे प्रवेश करत असतात.

| संस्था | कॅपमध्ये उपलब्ध जागा | अल्पसंख्याक जागा |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| शासकीय अनुदानित स्वायत्त व अस्वायत्त अल्पसंख्यांक तंत्रनिकेतने | (Lateral Entry + Vacant Seats) च्या 50 टक्के | रकाना क्र. 2 च्या व्यतिरिक्त उर्वरित 50 टक्के जागा |
| विनाअनुदानित अल्पसंख्यांक तंत्रनिकेतने | (Lateral Entry + Vacant Seats) - Minority Seats | (Lateral Entry + Vacant Seats) च्या रकाना क्र. 2 च्या उवरित 51 टक्के जागा |

त्याअनुषंगाने उपरोक्त तक्त्यात नमुद सर्व अल्पसंख्याक दर्जाच्या संस्थांना कळविण्यात येते की, शासन निर्णयात केलेल्या तरतुदीनुसार अल्पसंख्याक कोटयातील जागा भरण्यासाठी कार्यवाही केल्यानंतर ही सदर कोटयातील जागा रिक्त राहिल्यास सदर रिक्त जागा शासन प्रवेश नियमावलीत केलेल्या तरतुदीनुसार सर्वसामान्य जागा समजुन केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेतील गुणवत्ता यादीमधील विद्यार्थ्यांमधुन विहित कालावधीत प्रवेश करण्यास या संचालनालयची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर अल्पसंख्याक कोटयातील रिक्त जागांना अल्पसंख्याकाशी संबंधित कोणतेही फायदे मिळणार नाही.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचे कार्यालय
क.तंशिसं/विकाना/शैवि २/पदविका/२०१५/ 2328
दि. 28 JUL 2015

प्रति,
प्राचार्य,
सर्व अल्पसंख्यांक शासकीय अनुदानित /
विनाअनुदानित तंत्रनिकेतन,
नागपूर

यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता. वरिल पत्रात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

( गुलाबसिंग ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत:— प्रोग्रामर , यांनी सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.